# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहा.अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण विभाग, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, मुंबई - 400 013.

क्र. स.अ./जी.द./3260/(घ.क.व्य.) दिनांक : 10/03/2025

## "स्वारस्य अभिव्यक्ती" (E.O.I.)

## अशासकीय संस्थांमार्फत दोन स्त्री सफाई कामगार पुरविण्याबाबत सुचना

सदर सुचनेव्दारे सर्व ईच्छुक नोंदणीकृत अशासकीय संस्थांना कळविण्यात येते की, "कार्यस्थळी महिलांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंध प्रमुख अंतर्गत तक्रार समिती व सावित्रीबाई फुले स्त्री संसाधन केंद्र" येथे दैनंदिन साफसफाईच्या (हाऊसकिपींग) कामाकरीता 02 महिला सफाई कामगारांची एकुण 180 दिवसांसाठी खालील अटी व शर्तीनुसार ईच्छुक संस्थांनी सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण, दुसरा मजला, जी/दक्षिण विभाग कार्यालय, ना. म. जोशी मार्ग, प्रभादेवी, मुंबई - 400 013 यांच्या नावे नोंदणी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रतीं सहीत दि.15/03/2025 रोजी दुपारी 01.00 वाजेपर्यंत अर्ज करावेत. सदर तारखेनंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**अटी व शर्ती :-**

1. अर्जदार संस्था ह्या नोंदणीकृत असाव्यात तसेच त्यांना म.न.पा. च्या विविध उपक्रमामध्ये स्वच्छतेविषयी काम केलेल्याचा अनुभव असावा.
2. अर्जदार संस्थांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नोंदणी असलेल्या वेंडर कोड व ई-मेल आय-डी सहीत विषयांकीत काम मिळण्याकरीता अर्ज करावेत.
3. महिलांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंध प्रमुख अंतर्गत तक्रार समिती व सावित्रीबाई फुले स्त्री संसाधन केंद्र येथील प्रशासकीय अधिका-यांच्या आवश्यकते व सुचने नुसार दैनंदिन कामाकरीता मागणी केल्यानुसार सुरळीतपणे, विनालंब, सक्षम महिला सफाई कामगारांचा पुरवठा करणे.
4. विषयांकीत स्वरुपाच्या कामाचे वाटप पात्र ठरलेल्या संस्थांमधून सोडत प्रक्रियेव्दारे करण्यात येईल.
5. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सद्य प्रचलित किमान वेतन धोरणानुसार वेतनाचे अधिदान रु.773.46 प्रतिदिन / प्रति कामगार अधिक (+) 49.58% लेव्हीचे अधिदान या दराने राहील.
6. संस्थेतील कामगार महापालिकेमध्ये कायमस्वरुपी नोकरीकरीता हक्क सांगू शकणार नाहीत.
7. अयोग्य अर्ज कोणताही पत्र व्यवहार न करता फेटाळण्याचे तसेच विषयांकीत कामाचा कालावधी तथा मनुष्यबळाची संख्या ही परिस्थितीनुसार कमी-अधिक करण्याचा तथा सदर कामास स्थगिती देण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग ह्यांचे राहतील.

सही/-

**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण**